# रे.क.नं.१२७/२०१६ मधील निशाणी क्र.१३ वरील आदेश

१. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सदरचा अर्ज विना कैफियत व विना म्हणणेचा हुकूम रद्द होवून कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. सदर अर्जामध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादीचे दावेस कैफियत व म्हणणे न दिल्याने प्रतिवादी क्र. १ व २ यांचेविरुध्द मे.कोर्टानी ''विना कैफियत'' चा आदेश पारीत केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ हे गरीब व वयोवृध्द असून त्यांना कायद्याचे कोणतेही ज्ञान नाही. प्रतिवादी क्र. १ व २ हे वयोमानानुसार वरचेवर आजारी असल्याने वारंवार औषधोपचाराकरीता दवाखान्यात जावे लागते. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांना दाव्याच्या संदर्भातील जुनी माहिती व कागदपत्रांच्या नक्कला वेळेत मिळालेल्या नाहीत. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांच्या वकीलांना काम चालविणे संदर्भात माहिती देणेसाठी वेळेत येवून भेटले नसल्याने कैफियत व म्हणणे दाखल करणेबाबतची तजवीज करता आली नाही.त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कैफियत व म्हणणे देणेस जाणून बुजून टाळाटाळ केलेली नाही. तसेच वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट तसे न झाल्यास प्रतिवादी यांच्या कायदेशीर हक्कास बाधा पोहोचणार असून त्यांचे फार मोठे कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांचेविरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. १ व २ यांची कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मागत आहेत.

३. वादी यांनी म्हणणे देवून प्रतिवादी क्र. १ व २ यांनी अर्जात केलेली कथने खोटी व काल्पनिक असून वादी यांना मान्य व कबूल नाहीत. प्रतिवादी क्र. १ व २ यांना मुदतीत समन्स यांना लागू होवून देखील कैफियत देण्यास विलंब केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. याउलट अर्ज मंजूर करावयाचा असेल तर त्यांना जास्तीत जास्त कॉस्ट करण्यात यावी असे कथन केले आहे.

४. वादीतर्फे वकील श्री.एस.बी.देसाई यांचा युक्तिवाद ऐकला तर प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे वकील श्री.आर.आय.पालकर यांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी अनुक्रमे अर्ज व

म्हणण्यातील मजकुरानुरुप युक्तिवाद केला.

५. सदरचा दावा वादी यांनी कायम मनाई ताकीदीसाठी दाखल केला आहे. यातील प्रतिवादी क्र. १ व २ यांचेविरुध्द ''विना कैफियत'' चा हुकूम झालेला आहे. सदर झालेला हुकूम रद्द करुन प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर झालेला हुकूम रद्द न करुन कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी न दिलेस प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांचे बचावास संधी दिली नाही तर त्याला न्याय्य हक्कापासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे सदर परवानगी मिळणे न्यायोचित आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांचेविरुध्द झालेला ''विना कैफियत'' चा हुकूम रद्द करुन कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेस प्रतिवादी क्र. १ व २ पात्र आहेत. सबब, सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो. त्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रत्येकी रुपये ३००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी देण्यात येते.
३. अर्जाचा खर्च अंतिम निकालावर अवलंबून राहील.

सही/-
**(एच.व्ही.कुलकर्णी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांक- ०९/०७/२०१८